**नगर विकास विभागांतर्गतच्या अधिसूचित सेवांचे Business Process Re-Engineering करण्याकरिता विभागातील तज्ञ व्यक्तींचा अभ्यास गट नेमण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: नविवि २०२३/प्र.क्र.१८/नवि-२९**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०५ डिसेंबर, २०२४.

**शासन परिपत्रक:-**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ च्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात मा.मुख्य आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस नगर विकास विभागांतर्गतच्या अधिसूचित सेवांचे Business Process Re-Engineering करण्याकरिता विभागातील तज्ञ व्यक्तींचा अभ्यास गट नेमण्याबाबत निर्देशित करण्यात आले अहे. सदर निर्देशास अनसरुन शासनाने दि. २२.०८.२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये अभ्यास गटांची नेमणूक केली होती.

(२) त्यानंतर विविध प्रादेशिक विकास प्राधिकरणांची झालेली निर्मिती व राज्य मुख्य सेवा हक्क आयोग यांच्याकडील बैठकीतील सूचना विचारात घेऊन सिडको, एमएमआरडीए व अन्य प्रादेशिक विकास प्राधिकरण / महामंडळाकडील सेवांचे Business Process Re-Engineering करण्याकरिता शासन परिपत्रक दि.२२.०८.२०२३ अन्वये नेमण्यात आलेल्या अभ्यास गटामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | श्री.अश्वीन मुदगल, अतिरिक्त महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई. | अध्यक्ष |
| २ | श्री.अविनाश पाटील, संचालक, नगर रचना, पुणे. | सह-अध्यक्ष |
| ३ | सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासक), सिडको. | सदस्य |
| ४ | श्री.अनिल मरळे, संचालक, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे. | सदस्य |
| ५ | महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांनी प्राधिकृत केलेले प्रतिनिधी. | सदस्य |
| ६ | महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक यांनी प्राधिकृत केलेले प्रतिनिधी. | सदस्य |
| ७ | महानगर आयुक्त, छ.संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, छ.संभाजीनगर यांनी प्राधिकृत केलेले प्रतिनिधी. | सदस्य |
| ८ | आयुक्त, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर यांनी प्राधिकृत केलेले प्रतिनिधी. | सदस्य |
| ९ | महाआयटी चे प्रतिनिधी. | सदस्य |
| १० | महाव्यवस्थापक (प्रशासन), सिडको. | सदस्य सचिव |

**(३) अभ्यास गटाची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल:-**

१. अधिसूचित सेवा नागरीकांना अधिक सूलभतेने पुरविण्याच्या दृष्टीने प्रक्रिया सुलभ व सुरळीत करण्यासाठी Business Process Re-Engineering करणे.

२. Common Application Form तयार करणे.
३. Digi-Locker शी सेवा संलग्न करण्यासाठी कार्यपध्दती विकसित करणे.
४. अधिसूचित सेवांबाबत अभिलेख जतन करण्याबाबत कालावधी निश्चित करणे.
५. सर्व प्राधिकरणांमधील सेवांच्या कालावधीमध्ये व सोबत जोडावयाच्या कागदपत्रामध्ये एकसुत्रता आणणे.
६. सर्व प्राधिकरणांच्या सेवांसाठी SOP तयार करणे.

**(४) अहवाल सादर करण्यासाठी कालावधी:-**

सदर अभ्यास गटाने आपला अहवाल शासनास दोन महिन्यात म्हणजे दि. ३१.०१.२०२५ पर्यंत सादर करावा. अभ्यास गटात विहित वेळेत अहवाल सादर करण्याचे बंधनकारक आहे.

**(५)** सदर अभ्यास गटास आवश्यकतेनुसार बैठका घेता येतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१२०५१३३९१६६३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUBRAO NARAYAN SHINDE

Digitally signed by SUBRAO NARAYAN SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E5BB5862D0E131A274D92F7A1ACEF953E01301C1B0FB615DC6CCE4812BDED257, cn=SUBRAO NARAYAN SHINDE
Date: 2024.12.05 13:40:49 +05'30'

**(सुबराव शिंदे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (नवि-१), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (नवि-२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
५. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.
६. संचालक, नगर र चना व मुल्यनिर्धारण विभाग, पुणे.
७. संचालक, माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. संचालक, महाआयटी, मुंबई.
९. राज्य सुचना अधिकारी, राष्ट्रीय सुचना केंद्र (NIC), महाराष्ट्र, ११ वा मजला, नविन प्रशासन भवन, मुंबई.
१०. सह सचिव (नवि-२९), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व सह सचिव/उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती/नवि-२९.